**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २५ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **गगनयान मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेचा महत्त्वाचा टप्पा असलेली एअर ड्रॉप चाचणी यशस्वीरित्या पूर्ण.**
2. **मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतल्या २६ लाख अपात्र लाभार्थ्यांची छाननी होणार, महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांची माहिती.**
3. **एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा पगार गणेशोत्सवापूर्वी होणार - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक.**
4. **रस्त्यांवरील खड्ड्यांच्या प्रश्नावर काँग्रेस आक्रमक, नागपूर महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात जीपीएस लोकेशनसह खड्ड्यांच्या फोटोचे प्रदर्शन.**

-----------------------------------

गगनयान

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इसरोन गगनयान मानवी अंतराळ उड्डाण मोहिमेचा एक टप्पा असलेली एअर ड्रॉप चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. चाचणी यशस्वी झाल्याची माहिती इसरोन आपल्या समाज माध्यमावर दिली आहे. काल श्रीहरिकोटा इथं सतीश धवन अंतराळ केंद्रात झालेली ही चाचणी इसरो, भारतीय हवाई दल, DRDO, भारतीय नौदल आणि भारतीय तटरक्षक दल यांच्या संयुक्त प्रयत्नातून करण्यात आली.

-----------------------------------

गृहमंत्री अमित शहा

१३० व्या घटना दुरुस्ती विधेयकाला विरोधी पक्ष करत असलेला विरोध हा लोकशाही विरुद्ध असल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. एका वृत्त संस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी, आगामी काळात हे विधेयक पारित होईल, असा विश्वास व्यक्त केला. या विधेयकासंदर्भात विरोधक जनतेत संभ्रम निर्माण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. जनतेचं सरकार कारागृहातून चालवलं जावं का, असा सवाल करत शहा यांनी या विधेयक दुरुस्तीचं महत्व अधोरेखित केलं.विरोधी पक्षातले अनेक जण तुरुंगात बसून

सरकार बनवण्याचा आणि चालवण्याचा प्रयत्न करतात असं ते म्हणाले. हे विधेयक कोणताही पक्ष भेदभाव करत नाहीत, मुख्यमंत्री कोणत्याही पक्षाचे असोत, ते जर या शिक्षेच्या कक्षेत येत असतील, तर त्यांना कारवाईला सामोरं जावं लागेल, असं त्यांनी स्पष्ट केलं. जर एखादा लोकप्रतिनिधी दोन वर्ष किंवा त्याहून अधिक काळ तुरुंगात असेल, तर त्याचं संसद सदस्यत्व रद्द करण्याची तरतूद सध्याच्या कायद्यात असल्याचं शहा यांनी सांगितलं.......

***(होल्ड बाईट - केंद्रीय गृहमंत्री अमित शहा)***

***आज भी भारत के जन प्रतिनिधित्व कानून जो है उसके अंदर प्रावधान है, किसी भी चुने हुए प्रतिनिधि को 2 साल या इससे अधिक समय के लिए सजा होता है तो वो अपने स्थान से मुक्त हो जाएंगे सांसद के रूप में, अब उस पर हाईकोर्ट की अपील बाकी है, इस पर सुप्रीम कोर्ट की अपील बाकी है, मगर एक मोरल ग्राउंड तय करने के लिए कानून आजादी मिली तब से बना है, तो जैसे ही छूटते उनकी सदस्यता रिवाइव हो जाती है।***

**-------------------------------------**

मन की बात

पंतप्रधान मोदी येत्या ३१ तारखेला आकाशवाणी वरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२५ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपल्या सूचना आणि विचार एक आठ शून्य शून्य एक एक सात आठ शून्य शून्य या नि:शुल्क क्रमांकावर, नमो ॲप किंवा माय जीओव्ही ओपन फोरमवर नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**-------------------------------------**

लाडकी बहिण

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेतल्या २६ लाख लाभार्थ्यांची छाननी करण्याचे आदेश राज्य सरकारनं जिल्हा पातळीवरच्या यंत्रणेला दिले आहेत. सर्व जिल्ह्यातले हे लाभार्थी अपात्र असल्याचं माहिती आणि तंत्रज्ञान विभागानं कळवलं आहे. त्यांची प्रत्यक्ष छाननी करण्याचे आदेश महिला बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत. छाननी नंतर त्यांची पात्रता-अपात्रता ठरणार आहे. अपात्र लाभार्थ्यांवर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं आहे.

**-------------------------------------**

ग्रामीण रुग्णालय

भंडारा जिल्ह्याच्या लाखनी ग्रामीण रुग्णालयात सफाई कामगार असलेल्या महिलेन थेट रुग्णाला इंजेक्शन देण्याचा प्रकार समोर आला असून यामुळे रुग्णालय प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. दरम्यान या प्रकरणी कारवाई करण्याचे आश्वासन ग्रामीण रुग्णालय लाखनीचे वैद्यकीय अधिकारी एम.टी.भुते यांनी दिली -

***(होल्ड बाईट)***

***संबंधित रुग्ण यांनी जे आरोप केले आहे की वापरलेली सिरिंज त्यांना लावण्यात आलेली आहे. या प्रकरणाबद्दल मी सविस्तर माहिती घेऊन संबंधित कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्या पूर्ण पाठपुरावा करून संबंधित कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.***

**-----------------------------------------**

राष्ट्रीय क्रीडा दिन

29 ऑगस्ट रोजी साजऱ्या होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिन 25 ऑगस्ट अर्थात आज पासून ते 29 ऑगस्ट 2025 या कालावधीत "राष्ट्रीय क्रीडा सप्ताह" आयोजित करण्यात येणार आहे. त्यानुसार, भारत सरकारचे नागपूरच्या सेमिनरी हिल्स स्थित सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय आपल्या 75व्या वर्धापन वर्षानिमित्त, क्रीडा सप्ताह आयोजित करीत आहे. उद्या 26 ऑगस्ट रोजी कार्यालयीन परिसरात दिवसभर विविध स्पर्धा जसे की लिंबू शर्यत, व्हॉलीबॉल, दोरीवर उड्या, कॅरम, टेबल टेनिस, बुद्धिबळ, दोरीखेच, बॅडमिंटन आणि नेमबाजी आयोजित केल्या जातील.

**-----------------------------------------**

एस.टी.वेतन

राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्याप्रमाणे एसटीच्या सुमारे ८३ हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन गणपती उत्सवापूर्वी देणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एस.टी.महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटीच्या कर्मचाऱ्यांचा पगार हा महिन्याच्या ७ तारखेपासून १० तारखेच्या दरम्यान होत असतो. परंतु यंदा गणपती उत्सव हा ऑगस्ट महिन्याच्या शेवटी आल्यान केवळ वेतनामुळे त्यांचे उत्सवाच्या आनंदावर विरजण पडू नये म्हणून राज्य सरकारला एसटीच्या विविध सवलती पोटी ची प्रतिपुर्ती रक्कम लवकर देण्याची विनंती केली.

त्यानुसार २५ ऑगस्ट रोजी या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, लवकरच एसटीच्या सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या बँक खात्यांवर त्यांचे ऑगस्ट महिन्याचे वेतन जमा होईल.

------------------------------------

डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजना

सफाई कामगारांच्या निवास स्थानासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजने अंतर्गत नागपुरात पहिल्या टप्प्यात कामठीच्या उपलवाडी येथे 400 घरकुलांच भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती राज्यसफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी आज नागपूर महानगरपालिकेत घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी यावेळी सफाई कामगारांच्या पाल्यांसाठी शैक्षणिक योग्यतेनुसार रोजगारांची संधी, सफाई कामगारांना श्वसन विकार, कर्करोग यासारख्या दुर्धर आजारांसाठी कॅशलेस उपचाराची सुविधा यांची देखील माहिती दिली. यासोबतच कोविड काळात ज्या सफाई कामगारांना मरण आले त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ नागपुरात एक स्मारक देखील उभारल्या जाईल. असं त्यांनी या पत्रकार परिषदे दरम्यान सांगितलं.

------------------------------------

निदर्शने

नागपूरमधील रस्त्यांच्या खड्ड्यांबद्दल आणि जीर्ण झालेल्या स्थितीबद्दल काँग्रेस पक्षा तर्फे आज जोरदार निदर्शनं करण्यात आली. प्रदेश सरचिटणीस केतन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी जीपीएस लोकेशन वापरून खड्ड्यांचे फोटो काढले आणि महापालिका प्रशासनाविरुद्ध घोषणाबाजी केली. निषेधाच्या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिका मुख्यालयात कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. काँग्रेस कार्यकर्त्यांनी शहरातील खड्ड्यांचे फोटो दाखवून प्रशासनाला धारेवर धरले आणि रस्ते तातडीन दुरुस्त करण्याची मागणी केली.

------------------------------------

गणपती आगमन

नागपूरच्या प्रसिद्ध गणेश मंडळांपैकी एक असलेल्या नागपूरच्या राजाचं आज ढोल आणि संगीतासह गणेश पंडाल मध्ये भव्य आगमन झालं.. नागपूरच्या राजाची शाही मिरवणूक शहरातील चितार ओळी संकुलातून निघाली. नागपूरचा राजा गणपती रेशीमबाग मध्ये बसतो.पुढील दहा दिवस, नागपूरचे सर्व गणेश

भक्त नागपूरच्या राजाचे दर्शन घेण्यासाठी गणेश पंडाल मध्ये पोहोचतात. गणेश चतुर्थीच्या दिवशी, नागपूरच्या राजाला विधिवत अभिषेक केला जातो. विधिवत पूजा आणि आरती नंतर, गणपती बाप्पाचे दर्शन लोकांना उपलब्ध करून दिले जाते. नागपूरच्या राजाला सोन्याच्या दागिन्यांनी सजवले जाते.

------------------------------------

नीरी वैज्ञानिक

सीएसआयआर-नीरीचे प्रधान वैज्ञानिक डॉ.लाल सिंह यांना “द बेटर इंडिया शोकेस 2025” तर्फे “टीबीआय सस्टेनेबिलिटी चेंजमेकर्स” या श्रेणीत भारतातील पाच “सस्टेनेबिलिटी चेंजमेकर्स” पैकी एक म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. सन 2018 पासून, डॉ.सिंह विदर्भ प्रदेशातील फ्लाय-अशा प्रदूषित जमिनीच्या पुनर्स्थापनेच नेतृत्व त्यांच्या अभिनव इको-रिजुव्हेनेशन टेक्नॉलॉजी (ERT) द्वारे करत आहेत.

------------------------------------

महाराष्ट्राचा राज्य उत्सव

राज्य शासनाच्यावतीन या वर्षीपासून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा 'महाराष्ट्राचा राज्य उत्सव' म्हणून साजरा करण्यात येत आहे. या राज्य उत्सवाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' च्या अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेस मुदतवाढ देण्यात आल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. या स्पर्धेत अधिकाधिक मंडळांना सहभागी होता यावे, यासाठी आता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख उद्या २६ ऑगस्ट असेल. या स्पर्धेचे अर्ज https://ganeshotsav.pldmka.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जाणार आहेत.

------------------------------------